PDF Compressor Free Version

Maharashtra ECOTOURISM

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ

10/2, स्टार्की टाऊन-नागपूर ,सदर ,मंगलवारी बाजार ,440001
दुरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

**विषय:-** निसर्ग पर्यटन विकास आराखडा तयार करण्याकरिता मार्गदर्शक तत्वे.

**क्रमांक:** कक्ष-6/लले/का.समिती सभा/ 523 /2020-21

**नागपूर,** दिनांक : 23 मार्च, 2021

**प्रति,**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर /पश्चिम मुंबई
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन, मुंबई
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर/ठाणे/यवतमाळ/अमरावती/नाशिक/पुणे/औरंगाबाद/चंद्रपूर/कोल्हापूर
वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली/धुळे
वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प, नवेगांव नागझिरा, गोंदिया/ताडोबा अंधारी चंद्रपूर/सहयाद्री, कोल्हापूर
वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक

**संदर्भ** — या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-6/लले/का.समिती सभा/प्रक्र १२१/2020-21/४९५ दिनांक १६ मार्च २०२१

मंडळाच्या दिनांक ०९/०३/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेत कार्यकारी समितीने निसर्ग पर्यटन विकास आराखडा तयार करण्याकरिता मार्गदर्शक तत्वांना मान्यता प्रदान केलेली आहे. सदर मार्गदर्शक तत्वांची प्रत सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. तरी यापुढे निसर्ग पर्यटन विकासाकरिता तयार करण्यात येणारे आराखडे या मार्गदर्शक तत्वांचे आधारेच तयार करण्यात आले असल्याची खात्री करुनच त्यामध्ये नमुद केलेल्या पध्दतीनुसारच मंडळाकडे सादर होतील याची दक्षता घ्यावी. तसेच सदर आराखडे सादर करतेवेळी संबंधित निसर्ग पर्यटन स्थळाच्या नकाशाची KML File सोबत सादर करण्यात यावी.

(विकास गुप्ता)
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर 22/3/21

**प्रतिलीपी-** प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, यांना माहितीस सादर.
**प्रतिलीपी-** प्रधान मुख्य वनसंरक्षक मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य यांना माहितीस सादर.
**प्रतिलीपी-** प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य यांना माहितीस सादर.



28/3/21 3:40

PDF Compressor Free Version

## निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास आराखडा तयार करण्याकरिता सुधारीत मार्गदर्शक तत्वे

**ध्येय**

निसर्ग व वन्यजीव संवर्धनाबाबत जागरुकता निर्माण करणे तसेच स्थानिक, आदिवासी व पारंपारिक वन निवासी यांना आर्थिक उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करुन देणे व पर्यावरणीय, सांस्कृतिक व आर्थिक बाबी निरंतरपणे टिकविणे.

**1) राज्य निसर्ग पयर्टन वार्षिक नियोजन आराखडा**

मंडळ दरवर्षी जानेवारी ते मार्च दरम्यान पुढिल वर्षाकरीता निसर्ग पर्यटन विकासाकरीता प्रादेशीक/ वन्यजीव विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी चर्चेनंतर वार्षिक नियोजन आराखडा तयार करेल. सदर आराखडयाला मंडळाच्या कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात येईल.

वार्षिक नियोजन आराखडयात कामे चालु असलेली निसर्ग पर्यटन स्थळे व काही महत्वाच्या नवीन निसर्ग पर्यटन स्थळांचा समावेश करण्यात येईल. तसेच यामध्ये समाविष्ट स्थळांमध्ये शक्यतो बदल करण्यात येणार नाही.

**2) निसर्ग पर्यटन प्रकल्प बृहत् आराखडा (Master Plan)**

वार्षिक नियोजन आराखडयात समाविष्ट निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकासाकरीता वने/वन्यजीव क्षेत्रात निसर्ग पर्यटनाला चालना देण्याकरीता संबंधित उपवनसंरक्षक/ यंत्रणा प्रकल्प निहाय निसर्ग पर्यटन प्रकल्प बृहत् आराखडा तयार करेल. सदर आराखडा संबंधित विभागाचे/संरक्षित क्षेत्राच्या कार्य आयोजना/व्यवस्थापन आराखडयाशी सुसंगत असावा.

या आराखडयामध्ये निवड केलेले क्षेत्र, फिरण्याकरिता रस्ते/मार्ग, प्रस्तावीत निसर्ग पर्यटन सुविधा, अनुज्ञेय प्रवेश कालावधी, अनुज्ञेय पर्यटक संख्या/वाहन संख्या ईत्यादिंचा अंतर्भाव असावा. निसर्ग पर्यटनाकरीता वर्षातील निर्बंधोत विशिष्ट कालावधी क्षेत्र ईत्यादिंचा आराखडयांमध्ये स्पष्ट उल्लेख असावा. त्याचप्रमाणे स्थानिक समुहांचा सहभाग घेऊन प्रकल्प स्वयंचलीत (self sustainable) असावा, या करिताचे नियोजनाचा अंतर्भाव असेल.

**बृहत आराखडयामध्ये खालील बाबींचा यथायोग्य समावेश करावा.**

PDF Compressor Free Version

## *2.1 निसर्ग पर्यटन स्थळांची वर्गवारी*

निसर्ग पर्यटन स्थळांची पर्यटन स्तरानुसार वर्गवारी

1. जिल्हा 2. राज्यस्तर

यामध्ये प्रामुख्याने खालील प्रकारच्या पर्यटन स्थळांच्या समावेश राहिल.

- सृष्टी सौंदर्य पर्यटन (Landscape Tourism): यामध्ये नैसर्गिक वने, थंड हवेची ठिकाणे, धबधबे, वनफुलांनी सुशोभीत होणारी पठारे, उंच डोंगर, द-यामधील सृष्टी सौंदर्याची ठिकाणे ई. चा समावेश राहिल.
- वन्यजीव पर्यटन (Wild Life Tourism) – यामध्ये व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उदयाने, अभयारण्य, ईतर क्षेत्रे जेथे वन्यजीव दर्शन होईल अश्या क्षेत्रांचा समावेश राहिल. तसेंच वन्यप्राणी सफारी ई. चा देखील यामध्ये समावेश असेल.
- प्राचीन वारसा स्थळे पर्यटन (Heritage Tourism) - यामध्ये गड, किल्ले, जिवाश्म उदयान (Fossil Parks) व पुरातत्व महत्त्व (Archaeological Importance) असलेल्या स्थळांचा समावेश राहिल.
- नागरी वन/ निसर्ग उदयान पर्यटन (Urban Forest/Nature Park Tourism) – यामध्ये नागरी वन उदयाने, बांबु उदयान, फूलपाखरु उदयान, जैवविविधता उदयान, आरबोरेटम (Arboretum) अत्याधुनिक रोपवाटीका ई. चा समावेश राहिल.
- साहसी क्रिडा पर्यटन (Adventure Sports Tourism) – यामध्ये ट्रेकींग, रॉक क्लाइंबीग, रेपलिंग, सायकलींग, झिपलाईनिंग, पाण्यातील साहसी क्रिडा प्रकार ई. चा समावेश राहील.

## *2.2 निसर्ग पर्यटन क्षेत्रांमधील पायाभूत सुविधा*

निसर्ग पर्यटन स्थळांवरील नैसर्गीक संपत्ती व जैव विविधतेचे संवर्धन व्हावे यादृष्टीने शक्यतोंवर मोठी बांधकामे घेण्यात येऊ नये. निसर्ग पर्यटन स्थळी मुख्यत्वेकरुन खालील नमुद सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

1. निसर्ग परिचय केंद्र 2. निसर्ग शिक्षण संकुल 3. दर्जेदार स्वच्छता गृहे

4. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय 5. उपहार गृह 6. सोव्हीन्युअर शॉप

७. ॲम्फी थियेटर ८. आवश्यकतेनुसार कॅम्पींग साईट/निवास व्यवस्था विकसित करणे इत्यादी

९. निसर्ग पायवाट व विश्रांती स्थळे

PDF Compressor Free Version

पर्यटक संकुलाकरीता स्थायी बांधकामे निवास/भोजन व्यवस्थेकरीता बांधकामे, नविन रस्ते, पर्यटकांकरीता बंगले, व्यवसायीक निवास व्यवस्था ई. वनसंवर्धन कायदयातील तरतूदीनुसार पूर्व परवानगी शिवाय करण्यात येवू नये.

- निसर्ग पर्यटनाकरीता आवश्यक बांधकामे व रंगसंगती निसर्गाशी मिळतीजुळती असावी. पर्यटकांकरीता उभारण्यात येणाऱ्या सोई सुविधा पर्यटन क्षेत्राचे पर्यटक वहन क्षमतेच्या मर्यादेत असावे.
- गतकाळातील महत्वपूर्ण इमारतींचे आधुनिकीकरण (Renovation) करतांना शक्यतितके पुर्नज्जीवन (Restoration) करण्यावर भर द्यावा.
- निसर्ग पर्यटनामूळे स्थानिकांचे जिवनमान उंचावणे अपेक्षित असल्याने होम स्टे व आदरातिथ्य व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यात यावे.

## *2.3 निसर्ग पर्यटन स्थळांची पर्यावरणपुरकता*

निसर्ग पर्यटनामुळे शक्यतो कमीत कमी घन कचरा निर्माण होईल याची दक्षता घेण्यात यावी. जो काही घन कचरा निर्माण होत असेल त्याची रितसर विल्हेवाट लावण्याकरीता कार्यप्रणाली विकसित करणे. तसेच पर्यटन स्थळे व लगतच्या परिसरात पर्यटकांचे सोई, सुविधांकरिता उभारण्यात येत असलेल्या खाजगी रिसॉर्टस व इतर ठिकाणी सौर उर्जा वापर व इतर अपारंपारीक ऊर्जा स्त्रोतांच्या वापर करणे. वन्यप्राण्यांचे भ्रमणमार्ग खंडित होऊ नये याकरिता खाजगी पर्यटन संकुलाभवती पूर्ण कुंपण करण्याचे टाळणे. तसेच कंपोस्ट खत, गांडूळ खत ईत्यादी तयार करण्याकरीता ओल्या कचऱ्याचा वापर करणे.. तसेच जल पुनर्भरण यंत्रणेचा वापर करणे..

## *2.4 स्थानिकांचा सहभाग*

निसर्ग पयर्टन व्यवस्थापनमध्ये स्थानिकांची प्रमुख भुमिका आहे. त्यांनी प्रत्यक्षात पर्यटन प्रकल्पांचे व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे. स्थानिक, आदिवासी व पारंपरीक वन निवासी यांना पर्यटनाद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे अपेक्षित आहे. जेणेकरुन त्यांना पर्यटन क्षेत्राबद्दल आपुलकी निर्माण होऊन संवर्धनामध्ये ते महत्वाची भुमिका पार पाडतील. त्याचप्रमाणे निसर्ग पर्यटन स्थळाचे व्यवस्थापनामध्ये सहभागी होऊन प्रकल्प स्वंयचलीत होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतील.

## *2.5 क्षमता बांधणी (Capacity Building)*

PDF Compressor Free Version

अमलबजावणी यंत्रणेचे क्षेत्रीय कर्मचारी/अधिकाऱ्यांना हरीत कौशल्य व निसर्ग पर्यटनाशी संबंधित विशेष प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यटकांना निसर्गाबाबत मार्गदर्शन करणे, आदरातिथ्य व्यवस्थापना संबंधी दर्जेदार सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टिने स्थानिक, आदिवासी व पारंपारीक वन निवासी यांना क्षमता बांधणी करीता विविध प्रशिक्षण देण्यात येतील. उदा. निसर्ग मार्गदर्शक, निसर्ग निर्वचक, होम-स्टे, स्थानिक कलाकृती/साहित्य/फोटोग्राफी लघु उद्योजकता प्रशिक्षण देणे.

### *2.6 पर्यटक वहन क्षमता निश्चीती करणे*

निसर्ग पर्यटनाद्वारे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये याकरीता निसर्ग पर्यटन स्थळांना भेटी देणारे पर्यटक व वाहनसंख्या निर्धारीत करण्याच्या दृष्टिने प्रत्येक प्रकल्पाची पर्यटक वहन क्षमता निश्चीत करणे, जेणेकरुन पर्यटकांची/वाहनांची संख्या व प्रवेश वेळ निश्चीत करता येतील.

पर्यटक वहन क्षमता निश्चीत करतेवेळी खालील बाबी विचारात घेण्यात येतील.

- वने/वन्यजीव/क्षेत्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या पर्यटकांची संख्या व वेळ
- प्रवेश घेणाऱ्या वाहन/बोटिंची संख्या
- पायाभूत सोई-सुविधा
- पर्यटक भेटिचा कालावधी/हंगाम
- संरक्षित क्षेत्रात निसर्ग पर्यटनाकरीता उपलब्ध कालावधी ई.

### *2.7 पर्यटक अभिमुखता*

खालील विभिन्न पर्यटक समुहांची आवश्यकता पूर्ण होण्याच्या दृष्टीने विविध सोयी उपलब्ध करुन देण्यात येतील. हयामध्ये समाजातील सर्व स्तराच्या लोकांना सहभाग घेण्यात यावा. या करीता खालील बाबी विचारात घेवून समूह पर्यटनाला चालना देण्यात यावी.

- शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी समूह
- व्यावसायीक संस्थेचे कर्मचारी व कौटुंबीक समुह
- निसर्ग, पक्षी व वन्यजीव निरीक्षण करण्यास इच्छुक असलेले पर्यटक
- साहसी क्रिडा प्रकारात ईच्छुक पर्यटक

### *2.8 निसर्ग शिक्षण, माहिती व प्रसार*

PDF Compressor Free Version

निसर्ग शिक्षणाचा दृष्टीने पर्यटकांकरीता पक्षी निरिक्षण, निसर्ग पायवाटा, आकाश निरिक्षण, वन व वन्यजीव चित्रपट दाखविणे ई. बाबी महत्वपूर्ण आहेत. निसर्ग शिक्षण हा निसर्ग पर्यटनाचा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे पर्यटकांना माहिती व निसर्ग परिचयाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. हयामध्ये त्यांना निसर्गाबाबतची माहिती, पर्यटकांकरीता आचारसंहीता यांचा समावेश असेल. यासाठी भित्तीपत्रके, पत्रके तसेच प्रशिक्षित मार्गदर्शक आणि माहिती केंद्र किंवा परिचय केंद्राचा उपयोग करण्यात येतील. उत्तम दर्जाचे निसर्ग परिचय केंद्र व अभ्यागत कक्ष शक्यतो स्थानिकरित्या उपलब्ध साधनापासून तयार करण्यात येईल. शालेय विद्यार्थ्यांना वन, वन्यजीव आणि पर्यावरण संरक्षणाच्या संदेशाचे प्रभावी दुत मानले गेले आहे. शालेय विद्यार्थ्यांकडून पर्यावरणासंबंधी आणि निसर्गासंबंधी संवेदनशीलता विकसीत करण्याकरिता व पर्यावरण संरक्षणाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याकरीता निसर्गानुभव कार्यक्रमात अंतर्भुत विविध नैसर्गीक घटकांची माहिती देण्याकरीता मुलभुत सोई निर्माण करणे.

### *2.9 विस्तार/प्रसिध्दी*

Website, फेसबुक, Whatsapp, Twitter, Instagram ईत्यादी समाज माध्यमांचा प्रभावीरित्या वापर समाविष्ट असावा. त्याचप्रमाणे जनसामान्यांमध्ये विविध माध्यमांद्वारे (उदा. फिरती प्रदर्शनी) व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी. जाहिरात, पत्रके, माहिती पत्रके याव्दारे निसर्ग पर्यटनाच्या कार्यक्रमाची जाहिरात व व्यापक प्रसिध्दी देण्याचे प्रावधान असावे.

3) <u>आराखडा मंजूरी प्रक्रिया:-</u>

**वरील सर्व बाबी विचारात घेऊन निसर्ग पर्यटन विकास आराखडा तयार केल्यानंतर**

**संबंधित वृत्ताचे पालक प्रधान मुख्य वनसंरक्षक/ अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे अध्यक्षते खालील समिती व्दारे तपासणी होऊन त्यांचे शिफारशीसह आराखडा मंडळाचे कार्यकारी समितीचे मंजुरीस्तव मंडळाकडे सादर करावा.**

**मंडळाचे कार्यकारी समितीच्या सभेत संबंधित यंत्रणेने (शक्यतो संबंधित उपवनसंरक्षक) यांनी समिती समोर सादरीकरण करावे.**

4) **निसर्ग पर्यटन सर्वंकष प्रकल्प अहवाल (DPR)**

वरील प्रकारे आराखडा मंजुरी नंतर निसर्ग पर्यटन बृहत आराखडया च्या अनुषंगाने संबंधित यंत्रणा सर्वंकष प्रकल्प अहवाल (DPR) तयार करेल. त्यामध्ये प्रकल्प कालावधी व प्रत्येक वर्षी करावयाच्या

PDF Compressor Free Version

कामांबाबतची प्राधान्यता निश्चीत असेल. त्यामध्ये प्रकल्पनिहाय त्यावर्षी करावयाच्या कामांच्या कार्यबाबी व त्याकरीता आवश्यक अनुदान ई. बाबींचा समावेश असावा.

5) **पर्यटन स्थळांच्या विकासाकरीता निधी उपलब्धता**

जिल्हा स्तरावरील निसर्ग पर्यटन स्थळांवर सोई-सुविधा निर्मीतीकरिता जिल्हा नियोजन व विकास समिती व राज्य स्तरावरील पर्यटन स्थळाचे विकासाकरीता राज्य शासनातर्फे निधी उपलब्धते करीता प्रस्ताव कामाचे बाब निहाय तांत्रीक व प्रशासकीय मंजुरीसह मंडळाकडे सादर करावे. या व्यतिरीक्त राज्यस्तरीय निसर्ग पर्यटन प्रकल्पांना निधी उपलब्धततेकरीता इतर स्त्रोतांचाही वापर करण्यात यावा. उदा. केंद्र शासन, राज्य शासन उदा. वन विभाग, आदिवासी विकास विभाग, पर्यटन विभाग, उद्योजक सामाजिक उत्तरदायीत्व निधी (CSR), खाजगी संस्था व व्यक्तीकडून प्राप्त देणग्या ईत्यादी.

---